# अरे बापरे, भूत!





एक भूत होते. त्याला वाटायचे की ते खूप भीतीदायक आहे. कोणालाही घाबरवू शकते.

IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 2 6/16/23 23:13



ते रोज कोणाला तरी घाबरवत असे.

IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 3 6/16/23 23:13

एक दिवस त्याने आधाशी वाघाला घाबरवले.





IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 5 6/16/23 23:13



एक दिवस त्याने खूप मोठ्या हत्तीला घाबरवले.







एक दिवस त्याने लंगोटीवाल्या पहेलवानाला घाबरवले.

IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 9 6/16/23 23:13

एक दिवस तर त्याने मिशीवाल्या पोलीसाला घाबरवले.



IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 10 6/16/23 23:13




IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 11 6/16/23 23:13

लोक घाबरुन थरथर कापायला लागले की त्याला मजा वाटत असे.



IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 12 6/16/23 23:13

कोणाला ना कोणाला तरी घाबरवल्याशिवाय त्याला झोपंच येत नसे.



IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 13 6/16/23 23:13

एक दिवस त्याची तब्येत बिघडली.
पण तरीही त्याला कोणाला तरी घाबरवायचे होते.



IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 14 6/16/23 23:13

त्याने विचार केला की आज उंदराला घाबरवावे.
तो पटकन घाबरेल.





भूत बिळात घूसले.
उंदीर आरामात झोपला होता.

IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 16 6/16/23 23:13



धम् धम् आवाजाने तो
जागा झाला.

IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 17 6/16/23 23:13

तो घाबरुन थरथर कापू लागला.
थरथरत म्हणाला- क.. .क. . कोण आहे तिथे ?



IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 18 6/16/23 23:13

भूताने भीतीदायक आवाजात उत्तर दिले-

मी आहे, भूत!



IN-LLP-16-0022_Text_It'sAGhost.indd 19 6/16/23 23:13



उंदीर म्हणाला-भूत आहे होय! मला वाटले मांजर आहे.



पांघरूण घेऊन तो परत झोपी गेला.